क्रमांक : २२९०४ / ब,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
विधान भवन, मुंबई.
दिनांक : २९ नोव्हेंबर, २०२४.

:: परिपत्रक ::

**विषय : चौदावी विधानसभा विसर्जित झाल्यामुळे अतारांकित प्रश्न व्यपगत करण्याबाबत**

निदेशानुसार मंत्रालयीन विभागांना कळविण्यात येते की, चौदावी विधानसभा दिनांक २६ नोव्हेंबर, २०२४ रोजी विसर्जित करण्यात आली आहे. त्यामुळे चौदाव्या विधानसभेच्या कालावधीत विधानसभा सदस्यांनी दिलेले जे अतारांकित प्रश्न शासनाकडे प्रलंबित आहेत ते व्यपगत झाले आहेत. त्यामुळे त्या प्रश्नांची उत्तरे या सचिवालयाकडे पाठविण्याची आवश्यकता नाही.

तथापि, महाराष्ट्र विधानपरिषदेच्या सदस्यांनी दिलेल्या अतारांकित प्रश्नांबाबत वरील परिस्थिती लागू होत नाही. विधानपरिषद विसर्जित होत नसल्याने विधानपरिषदेच्या सदस्यांनी दिलेले व विभागाकडे प्रलंबित असलेले अतारांकित प्रश्न व्यपगत होत नाहीत. ही बाब लक्षात घेऊन आवश्यक ती कार्यवाही करावी अशी विनंती आहे.

**( सुषमा पाठक )**
कक्ष अधिकारी,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

प्रति,

सर्व मंत्रालयीन विभाग (प्रत्येकी दोन प्रती)